# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

:: प्रधान कार्यालय ::
" मुंबै बँक भवन", २०७, डॉ.दादाभाई नौरोजी रोड,
फोर्ट , मुंबई ४०० ००१, दूरध्वनी - २२६१७१ ५४ ते ५९

# पगारदार वैयक्तिक कर्ज धोरण

Z:\Vaishu\Karj Dhoran 2019\covering 2019.doc

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

**अद्यावत झालेला बदल**
**दिनांक : ३०/०४/२०१९ पर्यंत**

## पगारदार वैयक्तिक कर्ज
## (कलम ४९ अंतर्गत पगारदार व्यक्तींसाठी)

**(दिनांक २८/०८/२०१५ रोजी झालेल्या ४१/७ वी संचालक मंडळ सभा ठराव क्र. १९ अन्वये मंजूर झालेले व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या अद्यावत बदलासह)**

**कर्जाचे कारण**
प्रवास, औषधोपचार लग्नकार्य गृहदुरुस्ती व इतर आकस्मिक कारणासाठी.

**पात्रता**

१. १) अर्जदार शासकीय व निमशासकीय कार्यालयातील कायमस्वरुपी नोकरी करणारा असावा

**किंवा,**

२) पब्लिक लिमिटेड कंपनीमधील कायमस्वरुपी नोकरी करणारा असावा.
अ) कंपनीचे रजिस्ट्रेशन कमीत कमी ५ वर्षाच्या पुर्वीचे असावे.
ब) सदर कंपनीमध्ये कमीत कमी ५० कामगार असले पाहिजेत.
क) सदर कंपनीतील फक्त १ किंवा २ कर्मचारी कर्ज मागणीस पात्र होणार नाही.

२. अ) अर्जदार यांचा कलम ४९ अन्वये दरमहाचा संपूर्ण पगार कपात करुन देणेसंबंधी आस्थापनाचे हमीपत्र (बँक कर्ज परतफेड कालावधीपर्यंत अन्य बँकेत पगार वळते करणार नाही अशा आशयाचे) तसेच कर्जदाराने त्याचा संपूर्ण पगार मुंबै बँकेतील बचत खात्यात जमा करणेसंबंधी ECS Mandate सादर केल्यास असा कर्जदार कर्ज मंजूरीस पात्र राहील.
४१/१४ वी संचालक मंडळ सभा दि.५/१/२०१६ ठराव क्र.२६ नुसार

ब) अर्जदार यांच्या पगारातून कलम ४९ अन्वये दरमहाचा बँक कर्जाचा हफ्ता पगार कपात करुन देणेबाबत त्याचसोबत त्याची सेवानिवृत्ती / स्वेच्छानिवृत्ती, कामावरुन काढून टाकणे किंवा इतर कोणत्याही कारणाने त्याची सेवा संपुष्टात येत असेल तर त्याची आस्थापनामधील अंतिम देणी देण्यापूर्वी मुंबै बँकेच्या (व्याजासह संपूर्ण कर्ज येणेबाकीची) कर्ज खात्याची रक्कम कपात करुन देण्याबाबतचे बँक पुरस्कृत नमुन्यामधील आस्थापनाचे हमीपत्र सादर करणारा अर्जदार पात्र असेल. (रेल्वे कर्मचारी / खाण कामगार सदर कर्जासाठी अपात्र राहतील) संचालक मंडळ सभा दि.३१/०७/२०१८ ठराव क्र.२५ नुसार)

३. किमान २ वर्षे नोकरीत कायम झालेला कर्मचारी

४. अर्जदार याच्या मासिक पगारातून प्रोफेशनल टॅक्स व इतर सरकारी कपात होणारा कर्मचारी.
५. मुंबै बँकेच्या, कर्जदार पगारदार संस्थेतील, कर्जदार वरील कर्जास पात्र होणार नाही.

**कर्ज मर्यादा**
रु.५.०० लाख (मिनिमम वेजेस ॲक्टमधील तरतूदीस आधीन राहून)

**परतफेड कालावधी**
६० महिने (मुदत कर्ज) (ई.एम.आय रिडयुसिंग बॅलन्सनुसार)

**व्याजदर**
द.सा.द.शे.१३.५०% (बॅंकेने वेळोवेळी व्याजदरात केलेला बदल सदरील कर्जास लागू राहील.)

**कर्ज प्रस्तावास सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे**

१. अ) अर्जदार यांचा कलम ४९ अन्वये दरमहाचा संपूर्ण पगार कपात करुन देणेसंबंधी आस्थापनाचे हमीपत्र (बॅंक कर्ज परतफेड कालावधीपर्यंत अन्य बॅंकेत पगार वळते करणार नाही अशा आशयाचे) तसेच कर्जदाराने त्याचा संपूर्ण पगार मुंबै बॅंकेतील बचत खात्यात जमा करणेसंबंधी ECS Mandate सादर करावे लागेल.

ब) अर्जदार यांच्या पगारातून कलम ४९ अन्वये दरमहाचा बॅंक कर्जाचा हफ्ता पगार कपात करुन देणेबाबत त्याचसोबत त्याची सेवानिवृत्ती / स्वेच्छानिवृत्ती, कामावरुन काढून टाकणे किंवा इतर कोणत्याही कारणाने त्याची सेवा संपुष्टात येत असेल तर त्याची आस्थापनामधील अंतिम देणी देण्यापूर्वी मुंबै बॅंकेच्या (व्याजासह संपूर्ण कर्ज येणेबाकीची) कर्ज खात्याची रक्कम कपात करुन देण्याबाबतचे बॅंक पुरस्कृत नमुन्यामधील आस्थापनाचे हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२. अर्जदार/जामिनदार यांचे KYC पगारस्लीप, फॉर्म नं.१६, आय.टी.रिटर्न इ. एक वर्षाचे बॅंक स्टेटमेंट

३. अन्य बॅंकेतील खात्याचे ५ आगावू दिनांकीत (Post dated) धनादेश घेणे आवश्यक असून त्यांचा ॲग्रीमेन्ट मध्ये उल्लेख असणे आवश्यक राहील.

**कर्ज मंजूरी पात्रता**
नेट पगाराचे रक्कमेतून, घर खर्चासाठी १/४ इतकी रक्कम वजा जाता, उर्वरित रक्कम बॅंक कर्ज परतफेडीसाठी ग्राहय धरुन कर्ज मर्यादा निश्चित केली जाईल.

**प्रोसेसिंग फी**
**१% (मंजूर रक्कमेच्या)**
४१/१६ वी संचालक मंडळ सभा दि.३०/१/२०१६ ठराव क्र.३४ नुसार

**कर्ज उचलीचे वेळी घ्यावयाची कागदपत्रे**

१. वचनचिठ्ठी

२. अंडरटेकींग

३. लेटर ऑफ लीन ॲण्ड सेट ऑफ

४. Irrevocable Authority and declaration of dues from salary

५. Agreement of loan

## अटी व शर्ती

१. कर्जदार तसेच जामिनदारास बँकेने नाममात्र सभासद (Nominal Member) व्हावे लागेल. (रु.१०/- प्रवेश फी व रु.१०००/- नाममात्र सभासद फी)

२. कर्जाची रक्कम, के.वाय.सी. नॉर्मची पुर्तता करुन उघडलेल्या, सेव्हींग खात्यात जमा करुन मागणीनुसार सदर खात्यातून उचल दिली जाईल.

३. सदर कर्जावर द.सा.द.शे.१३.५०% व्याजदर राहिल. तसेच बँकेने वेळोवेळी व्याजदरात केलेला बदल सदरील कर्जास लागू राहील.

४. कर्जदाराचा हप्ता जरी ECS / NEFT व पगार कपातीद्वारे येत असेल तरी अर्जदाराचे अन्य बँकेतील खात्याचे, बँकेच्या नांवे दिलेले ५ कोरे, आगाऊ तारखेचे (Post dated) धनादेश घेणे बंधनकारक राहील.

५. दरमहाचा हप्ता (मुद्दल+व्याज) पुढील महिन्याचे २० तारखेपर्यंत भरणे आवश्यक राहिल.

६. दरमहाचा हप्ता विहित वेळेत भरला नाही तर बँकेच्या नियमानुसार लेट पेमेंट चार्जेस हप्त्याचे रक्कमेनुसार वसुल केले जातील.

७. पगारदार वैयक्तिक (कलम ४९ अंतर्गत) कर्जासाठी एक सक्षम जामिनदार म्हणून दुसऱ्या नामांकित आस्थापनामधील कर्मचारी असणे आवश्यक राहील. (सदर आस्थापनामध्ये कमीत कमी ५० कामगार / कर्मचारी नोकरीत असणे आवश्यक राहील.)

८. या अटी संदर्भात संबंधीत कर्जदारास अतिरीक्त सुविधा म्हणून कर्जदाराची कर्ज रक्कमे इतकी विमा पॉलीसी बँकेच्या स्वखर्चाने काढुन देणेसंबंधी निर्णय झाला असुन यासंबंधीची पुढील कार्यवाही बँकेच्या हिशेब विभागामार्फत करणेत यावी. (या अटी संदर्भात बँकेची दि.२७/०७/२०१७ रोजीची कार्यालयीन सूचना पहावी.)

९. कर्जाच्या अटीमध्ये पूर्व सूचने विना बदल करण्याचा तसेच जादा अटी अंतर्भूत करण्याचा अधिकार बँकेस राहील व तो कर्जदारास बंधनकारक राहिल.

## कर्ज मंजूरी व वितरण प्रक्रीया

१. शाखा व्यवस्थापकांना प्राप्त झालेल्या कर्ज मागणी अर्जाचा, अभ्यास करुन, संबंधीत कर्ज धोरणानुसार, सर्व आवश्यक बाबींची पूर्तता झालेसंबंधी खातर जमा करुन, नियमात बसत असेल तरच अशा कर्ज मागणी प्रस्तावाची तपासणी शाखा व्यवस्थापक / शाखेतील अधिकारी यांनी करून घ्यावी कर्ज मंजुरी पुर्वी कर्जदार व जामिनदारांचे सिबील रिपोर्ट समाधान कारक असेल तरच पुढील प्रक्रिया करण्यात यावी अशी कर्जे मंजुर / नामंजुर करण्याचे अधिकार शाखा व्यवस्थापक यांना राहील. **(बँकेच्या दि.१५/०१/२०१८ रोजीच्या कर्ज विभागातील कार्यालयीन सूचनेनुसार )**

२. कर्ज मंजुरी नंतर कर्जदाराचे संपुर्ण नांव, वडिलांचे पुर्ण नांव, नोकरी, गावचे संपुर्ण पत्ते, पिनकोडसह घेऊन कर्जदार व जामिनदाराचे बचत खाते शाखेने उघडवयाचे असुन खाते उघडल्यानंतर कर्जदार व जामिनदारास शाखेने वेलकम पत्र पाठवावयाचे आहे.

३. सदरचे वेलकम पत्र अर्जदार / जामिनदार शाखेत घेऊन आल्यानंतरच व पत्याची खातरजमा झालेनंतर खात्यावर व्यवहार करण्यात परवानगी द्यावी.

४. शाखास्तरावर प्राप्त झालेल्या कर्जमागणी प्रस्तावाची नोंद संबंधीत शाखास्तरावर स्वतंत्र रजिस्टर मध्ये ठेवावयाची असून, कर्ज मंजूरी पत्र किंवा कर्ज नामंजूर केल्यास कारणांसह नामंजुरी पत्र, शाखा व्यवस्थापक यांनी पाठवावयाचे आहे.

५. कर्ज नामंजूर झाल्यास, प्रोसेसिंग फी संबंधीत अर्जदारास परत करता येईल. मात्र कर्ज मागणी अर्जासोबत सादर केलेले दस्तऐवज खोटे असल्यास अशा अर्जदाराला प्रोसेसिंग फी व सर्व्हीस टॅक्सची रक्कम परत देता येणार नाही.

६. शाखा व्यवस्थापक यांनी मंजूर कर्जाची उचल दिल्यानंतर त्याची एक प्रत विभागीय व्यवस्थापक यांना मुळ प्रत व एक प्रत दक्षता विभाग यांना सादर करावी.